विकास महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल
रु. २.०० कोटीवरुन ५ कोटीपर्यन्त वाढविणे
बाबत...

महाराष्ट्र शासन
समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग,
शासन निर्णय क्र. व्हीजेडब्ल्यू १०८८/४७७९४/१२२/मा व क-२,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२.
दिनांक: ६ फेब्रुवारी, १९८९.

वाचा: १] शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्र. व्हीजेडब्ल्यू-१०८३/८५/का-५, दिनांक १ ऑक्टोबर, १९८३.

२] वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाचे पत्र क्र. वनाम/विकास/२९६/२११०/८८, दिनांक २८.१.१९८८.

शासन निर्णय: वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित या शासन अंगीकृत उपक्रमाची निर्मिती शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्र. व्हीजेडब्ल्यू १०८३/६८३/का-७, दिनांक १.१०.१९८३ अन्वये करण्यांत येऊन हे महामंडळ कंपनी कायदा १९६० खाली पंजिबध्द झाले आहे. स्थापनेच्या वेळी या महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल रु.२.०० कोटी ठरविण्यांत आले होते. या महामंडळातर्फे विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या सर्वांगिण विकासासाठी राबविण्यांत येणाऱ्या योजनांचा वाढता व्याप विचारात घेऊन वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल रु.२.०० कोटीवरुन रु.५.०० कोटीपर्यन्त वाढविण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

२. विचारांती शासन या शासन निर्णयाद्वारे वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ [मर्यादित] चे अधिकृत भागभांडवल रु.२.०० कोटी वरुन [रुपये दोन कोटी] रुपये ५.०० कोटी [रुपये पाच कोटी] पर्यन्त वाढविण्यास व प्रत्येकी रु.१००/-च्या ५०० लाख विभागणी योग्य भागात मंजूरी देत आहे.

३. हा शासन निर्णय नियोजन विभाग व वित्त विभागाच्या संमतीने वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. सीआर-२७/८९/साऊ-२, दिनांक २५.१.१९८९ नुसार निर्गमित करण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

[ रमेश शिंदे ]
कक्ष अधिकारी

प्रति:
राज्यपालांचे सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

..२.